साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक २१ ● मंगळवार, दि. ८ ते १५ ऑक्टोंबर २०२४ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू

# नवसाला पावणारी रिसोडची श्री पिंगलाक्षी देवी

**रिसोड (शहर प्रतिनीधी) - नवसाला पावणारी ग्रामदेवता म्हणून वाशिम जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेल्या श्री पिंगलाक्षी देवी संस्थान मध्ये ३ ऑक्टोंबर पासून नवरात्र महोत्सवाला सुरुवात झाली आहे. कोरोना महामारी नंतर मागील २ वर्षा पासून हा नवरात्र महोत्सव निर्बंधमुक्त वातावरणात साजरा होत आहे. ३ ऑक्टोबर पासून १२ ऑक्टोबर पर्यंत विजयादशमीच्या सिमोल्लंघणाने महोत्सवाची सांगत होणार आहे. नवरात्राच्या दहा दिवस येथे भक्तांची मांदियाळी असते. राज्याच्या विविध भागातून भाविक भक्त मोठ्या संख्येने दर्शनास येतात. नवसाला पावणारी ग्रामदेवता म्हणून सर्व भाविक भक्तांचे श्रध्दास्थान असल्यामुळे दररोज हजारो भाविक भक्त दर्शनाचा लाभ घेतात.**



रिसोड शहरापासून दक्षिणेला तीन किलोमिटर अंतरावर निसर्गरम्य अशा १०० एकर तलावाच्या काठी श्री पिंगलाक्षी देवीचे पुरातन मंदिर असून मंदिराच्या सभोवती पुरातन वटवृक्ष आहेत. ऋषीमुनींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मंदिराला ऐतीहासिक महत्व असून नुकताच मंदिराचा नक्षीदार संगमरवरी बांधकामाणे जिर्णोद्धार झाला आहे. सकाळी ४ वाजता पासून भाविक भक्त दर्शनासाठी येतात. सकाळी अनवानी पायी दर्शनास येण्याची येथे प्रथा असून सकाळची काकड आरती व संध्याकाळची शेजारती तसेच नवरात्राच्या नऊ दिवस विविध धार्मक कार्यक्रमांची रेलचेल असते. मंदिर परीसरामध्ये पूजेच्या साहित्याची व प्रसादाची भरपूर दुकाने लागतात व या परिसराला यात्रेचे स्वरुप येते. मंदिर परीसरात वनभोजनाची प्रथा असून नागरीक या ठिकाणी नवरात्राच्या १० दिवसामध्ये वनभोजनाचा आनंद घेतात. भाविकांच्या सोयीसाठी रिसोड नगर परिषद शहरापासून ते मंदिरापर्यंत एलईडी लाईट लावते व स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने विविध सोयी सवलती देते. सार्वजनिक बांधकाम विभाग रस्त्याची डागडुजी करते. कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने रिसोड पोलीसांचा चोख बंधोबस्त व शहरापासून मंदिरापर्यंत पोलीसांची गस्त असते. वाघमारे परीवाराकडे मंदिराच्या पुजेची जवाबदारी असून बगडीया परिवाराकडे वंश परंपरेने मदिराचे व्यवस्थापन आहे. मंदिर परिसरात भाविकांच्या सोयी सवलतीसाठी श्री पिंगलाक्षी देवी संस्थान कार्यरत असते. सकाळी मंदिर परीसरामध्ये भावीक भक्तांसाठी चहा फराळ व प्रसादाचे विविध संघटनाद्वारे वाटप होत असते.

नवरात्र महोत्सव यशस्वी करण्यासाठी शहरातील विविध संघटना, नागरीक व भाविक भक्तांचा मोठा सहभाग असतो. नवरात्राच्या दहा दिवस भाविक भक्तांमध्ये भक्तिमय वातावरण असते. त्यांचा उत्साह पहावयास मिळतो.

मंदिर व्यवस्थापनाने मंदिराची जुनी रचना कायम ठेवत शहरात कोणतीही वर्गणी न मागता भाविक भक्तांच्या दानपेटीतील देणगीतून सुंदर संगमरवरी नक्षीदार मंदिराची निर्मीती केली असुन तलावाचे सौंदर्यीकरण व मिंदर परीसरातील विकासाकडे या भागातील राजकीय नेते, सामाजिक संघटना व नागरीकांनी पुढे यावे असे आवाहन मंदिर व्यवस्थापन समितीच्या वतीने संतोष वाघमारे यांनी केले आहे.

## भा.ज.पा युवामोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पदी

# लकी रोकडे जैन नियुक्ती



रिसोड - काल रिसोड येथील माहेश्वरी भवन मध्ये आयोजित भारतीय जनता पार्टी ०३३ रिसोड-मालेगांव विधानसभा कार्यकर्ता संवाद बैठक मध्ये मा.श्री विश्वासजी सारंग मा.मंत्री ग्रामविकास मध्यप्रदेश सरकार यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये तथा मा.श्री युवा नेते रिसोड-मालेगांव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुलदादा देशमुख तालुका अध्यक्ष शहर अध्यक्ष भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोलभाऊ भुतेकर जि.प सदस्य यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये भा.ज.पा युवा मोर्चा वाशिम जिल्हा उपाध्यक्ष म्हणून लकीभाऊ रोकडे जैन मालेगांव याची नियुक्ती करण्यात आली आहे भा.ज.पा युवा मोर्चा वाशिम जिल्हा सचिव पदी रवीभाऊ बळी याची पण नियुक्ती करण्यात आली आहे नियुक्ती पत्र मा.श्री.विश्वासजी सारंग ग्रामविकास मंत्री मध्ये प्रदेश यांच्या हस्ते देण्यात आले सर्व कार्यकर्ते पदाधिकारी याच्या प्रमुख उपस्थिती मध्ये कार्यक्रम संपन्न झाला.

## भारत माध्यमिक कन्या शाळेचा विभागीय स्तरावर

# हॉलीबॉल संघ उपविजेता



रिसोड - भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथील हॉलीबॉल संघ यापूर्वी तालुकास्तर आणि जिल्हास्तर विजेता ठरला असून दिनांक ४ ऑक्टोबर २०२४ रोजी यवतमाळ येथे पार पडलेल्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा विभागीय क्रीडा कार्यालय अमरावती द्वारा विभागीय हॉलीबॉल स्पर्धेमध्ये भारत माध्यमिक कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी सुरुवातीला पहिल्या फेरीत यवतमाळ वनी हॉलीबॉल संघासोबत विजयी सलामी दिली.

दुसऱ्या फेरीत बुलढाणा हॉलीबॉल संघासोबत विजय प्राप्त केल्यानंतर अंतिम फेरीमध्ये अमरावती हॉलीबॉल संघासोबत भारत माध्यमिक कन्या शाळेचा हॉलीबॉल संघ उपविजेत्या ठरला असून त्यामध्ये कर्णधार कु. प्रणाली सरनाईक, ज्ञानेश्वरी बाजड, दुर्गा पोळ, कल्पना झळके, ऋतुजा झळके सागर जायभाय ,ख़ुशी खडसे, श्रद्धा खडसे, लक्ष्मी खंडागळे, साक्षी सावंत, यशस्वी इप्पर व वैष्णवी खुळे इत्यादी यशस्वी हॉलीबॉल विद्यार्थिनी खेळाडूंनी उत्कृष्टरित्या कामगिरी केल्याबद्दल विद्यार्थिनींचे शाळेच्या वतीने प्राचार्या मंजुषा सु. देशमुख मॅडम, पर्यवेक्षक विलासराव देशमुख सर, तसेच विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक सुधीर देशमुख सर, सर्व शिक्षक, शिक्षिका ,शिक्षणेतर कर्मचारी आणि पालक वर्ग व सर्वत्र स्तरातून कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

# एसटीएमव्हीची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये दमदार कामगिरी



रिसोड - आज दि.०७ऑक्टोबर २०२४ वार सोमवार रोजी जिल्हा क्रीडा संकुल वाशिम येथे जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा पार पडल्या. रिसोड तालुक्यातील कंकरवाडी येथील संत तुकाराम महाराज विद्यालय उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये दमदार कामगिरी केली. वर्ग ११ वीची विद्यार्थिनी १७ वयोगटामधून कु. गौरी दत्ता मानोरकर हिने ४० वजन गटातून मधून प्रथम क्रमांक मिळवून विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे.

तसेच १४ वयोगटामधून वर्ग ८वीचा अविनाश भगवान पांडे ३५ किलो वजन गटामधून , प्रणव अश्रुबा कोल्हे ३८ किलो वजन गटामधून कुस्ती या स्पर्धेमध्ये उपविजेता ठरले. तसेच वर्ग १२ वी मधून गजानन किसन बोंडे ५७ किलो वजन गटामधून व ओंकार किसन बोंडे ४५ किलो वजन गटामधून कुस्ती स्पर्धेमध्ये उपविजेते ठरले.

त्यांच्या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण ढेकळे , सचिव सरस्वती लोंढे ,शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव जाधव संचालक सुनीलजी ढेकळे, क्रीडा शिक्षक मनोज जाधव तसेच प्राध्यापक ,शिक्षक, शिक्षिका,व शिक्षकेतर कर्मचारी, शाळेचे पदाधिकारी तसेच पालक यांनी विजयाबद्दल त्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# भारतातील डॉक्टरांची परदेश वारी

आरोग्यव्यवस्था किंवा रुग्णालयांना इतका पैसा मिळतो आहे, तर त्याचा लाभ तेथील कर्मचाऱ्यांना होतो आहे का? या व्यवस्थेत कार्यरत असलेले कर्मचारी श्रीमंत होत आहेत का? या दोन्हीचे उत्तर 'नाही' असे आहे. भारतीय वैद्यकीय शिक्षण यंत्रणेच्या रचनेतच त्यातील केंद्रीकरणाची काही कारणे लपलेली आहेत. वैद्यकीय शिक्षणाचा वाढता खर्च हे बाजारीकरणाचे मोठे कारण आहे. देशात आज अवघी १०८ सरकारी वैद्यकीय महाविद्यालये असून त्यात १,०८,८४८ पदवीधर आणि ६८,००० पदव्युत्तर शिक्षणाच्या जागा आहेत, तर बाकी ५९८ खासगी महाविद्यालये आहेत. प्रत्येक शासकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यावर शासन शुल्क सवलतीच्या माध्यमातून सुमारे ३५ लाख रुपये खर्च करते. परंतु खासगी वैद्यकीय पदवीधर शिक्षण घ्यायचे असल्यास आज एका विद्यार्थ्याला १.५ ते २ कोटी रुपये खर्च करावे लागतात. पदव्युत्तर शिक्षण घेईपर्यंत हा आकडा आणखी वाढतो. शिक्षणानंतर रुग्णालय सुरू करायचे असल्यास खर्च काही कोटी रुपयांच्या घरात जातो. परिणामत: अनेक विद्यार्थी परदेशात वैद्यकीय शिक्षण घेऊन नोकरी करणे पसंत करतात. इतके कर्ज डोक्यावर असताना आणि लठ्ठ पगाराची नोकरी खुणावत असताना कुठलाही विद्यार्थी ग्रामीण भागातील सेवांकडे कसे वळणार? ग्रामीण भागात काम करताना येणारे अनुभव, अपुऱ्या मूलभूत सेवा, तुटपुंजे आर्थिक सहाय्य आणि कागदोपत्री 'माहिती' आणि 'अहवाल' वेळेवर भरण्यावर असलेले लक्ष हे निश्चितच कुठल्याही विद्यार्थ्याला हुरूप देणारे नाही. त्यामुळे ग्रामीण भागात सेवा पुरवण्यास बहुतांश वैद्यकीय विद्यार्थी आणि तज्ज्ञ तयार नसतात.आज भारताबाहेर नोकऱ्या शोधण्याची अनेक वैद्यकीय कर्मचाऱ्यांची इच्छा दिसते. भारतातील ६.४ लाख परिचारिका आज देशाबाहेर कार्यरत आहेत. भारत आणि फिलिपीन्स हे देश ही मागणी पुरवण्यात अग्रेसर आहेत, तर दुसरीकडे देशात पाच लाख अतिरिक्त परिचारिकांची गरज आहे. भारतातल्या आरोग्य व्यवस्थेतले पगार आणि कार्यालयीन परिस्थिती तितकीशी चांगली नाही. भारतातून वैद्यकीय तज्ज्ञ आणि परिचारिका का निघून जात आहेत याचा आपण अगदी अलीकडेपर्यंत विचार केलेलाच नाही, आणि अजूनही त्यावर ठोस पावलेही उचलली गेलेली नाहीत. महानगरांमध्ये उच्चभ्रू मानल्या गेलेल्या रुग्णालयात आजही बहुतांश परिचारिकांचा पगार महिन्याला २५ ते ५० हजार इतकाच आहे. कोविड काळात देशभरात परिचारिकांनी समान आणि पुरेशा वेतनाची मागणी केली होती. परंतु त्यावर दिल्ली राज्य शासनाने नियम केल्यावर मात्र गहजब उडाला. अनेक मोठ्या रुग्णालयांनी यामुळे किंमत वाढून रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होईल आणि रुग्णालयांचे अर्थकारण विस्कळीत होईल असे नमूद केले होते. प्रश्न हा आहे, की रुग्णालयांकडे परिचारिकांना वेतनवाढ द्यायला आज खरंच पैसे नाहीत का?

## प्राचीन, ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास दोन वर्षाचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद

मुंबई - राज्यातील प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास आता दोन वर्षांच्या तुरूंगवासाची तसेच एक लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

अशा वास्तूंना हानी पोहचवून त्यांचे पावित्र्य भंग करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी ही तरतूद करण्यात येत आहे. सध्या, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पूराणवस्तूशास्त्रविषयक स्थळे व अवशेष नियम सन १९६० (१९६१चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१२) मधील तरतुदींनुसार तीन महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा पाच हजार रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद आहे. १९६० पासून या दंडात वाढ झालेली नाही. या कायद्यात कठोर तरतुदींची आवश्यकता आहे. केंद्र शासनाच्या १९५८च्या अधिनियमातील सुधारणांशी सुसंगत अशा तरतूदी करणे आवश्यक असल्याने हा वाढीव शिक्षेचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

## सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ

मुंबई - राज्यातील सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळातर्गत हे महामंडळ असेल. या महामंडळाचे (उपकंपनी) मुख्यालय मुंबई येथे राहील. तसेच संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळाच्या योजना या उपकंपनीमार्फत राबवण्यात येतील. या उपकंपनीस पन्नास कोटींचे भागभांडवल देण्यात येईल. तसेच सोळा पदे भरण्यात येतील.

# कृषिदुतांकडून मळणी यंत्रांबाबत मार्गदर्शन



रिसोड : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित कृषी महाविद्यालय रिसोड येथील अंतिम वर्षीच्या विद्यार्थ्यांनी कृषी अभियांत्रिकी विभागाच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम २०२४ अंतर्गत ग्राम चिखली येथे कापणी व मळणी यंत्रांबाबत शेतकर्यांना मार्गदर्शन दिले. सदर प्रात्यक्षिकात कापणी व मळणी यंत्रांची रचना, कार्यपद्धती, यंत्र वापरताना घ्यावयाची काळजी, हंगामानंतर व साठवणूकीपुर्वी करावयाची देखभाल, ईत्यादी बाबी नमूद करण्यात आल्या.

प्रात्यक्षिकावेळी ग्रामस्थ शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाला चिखली च्या सरपंच सौ. मनीषा रमेशराव अंभोरे, उपसरपंच घनश्याम लाड यांचे सहकार्य लाभले. प्रात्यक्षिकात कृषिदुत उज्वल लोंढे, संकेत गोरडे, मयूर चव्हाण व श्रीकांत तिडके यांनी मार्गदर्शन केले. प्रा मनोज वि. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. उपप्राचार्य डॉ. पी. जी. देव्हडे, तांत्रिक समन्वयक आर. डवरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. डी. मसुडकर आणि विषय विषयतज्ज्ञ प्रा. मनोज वि. जाधव यांचे सहकार्य लाभले. (वि. प्र.)


महाराष्ट्र वन विभाग
"वृक्षवल्ली आम्हासोयरे वनचरे"

**महाराष्ट्र शासन**

# उपवनसंरक्षक (प्रादे) वाशिम वन विभाग वाशिम यांचे कार्यालय

समाज कल्याण कार्यालयाजवळ, शासकीय आदिवासी मुलांचे वस्तीगृहासमोर, वाशिम जि. वाशिम ४४४५०५
दुरध्वनी क्र. – (०७२५२) २३५५८९ Email ID - dycfwashim@mahaforest.gov.in / dcfwashim@gmail.com

**Tan No. NGPDO5754A** **DCF GST No. 57AAALD2838F1ZC**

## ई-निविदा सुचना क्र. ०३/२०२४-२५

महाराष्ट्र शासनाचे सक्षम प्राधिकरणाकडे योग्य त्या वर्गातील पंजीबध्द असलेल्या पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ब-१ विवरणपत्राप्रमाणे ई-निविदा प्रपत्रात वाशिम वन विभागातील हे खालील निर्देशीत कामाकरीता प्रतिशत टक्केवारी दराने ई-निविदा पध्दतीच्या माध्यमातून ई-निविदा आमंत्रीत करीत आहेत. निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर सविस्तर निविदा **दिनांक ०९/१०/२०२४** पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव व ठिकाण | वनपरिक्षेत्र | निवीदा व प्रमाणे कामाची किंमत | निविदा सोबत सादर करावयाची अनामत रक्कम 1% | निविदा स्वीकृत झाल्यास सुरक्षा ठेव रक्कम 2% | ई-निविदा नमुन्याची किंमत रुपये | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | मौजे चिस्ताळा ता. मंगरुळपीर येथील वनतलावाची विशेष दुरुस्ती करणे प्रोजेक्ट कोड : 28/2803/DT/SF/ Rep Lake /2 | मानोरा | २०८८००० | २०८८० | ४१७६० | ११२० | ३० दिवस | OPEN |
| | मौजे शेगी ता. मंगरुळपीर येथील वनतलावाची विशेष दुरुस्ती करणे प्रोजेक्ट कोड : 28/2803/DT/SF/ Rep Lake /1 | मानोरा | २११७००० | २११७० | ४२३४० | ११२० | ३० दिवस | OPEN |

**ई-निविदा कार्य प्रणालीद्वारे निविदा भरणेची दिनांक, निविदेचा नमुना, निविदे संबंधी इतर तपशील खालील प्रमाणे देण्यात आलेला आहे.**

9. कामाची सविस्तर निविदा सुचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक **09/10/2024** ते **17/10/2024** पर्यंत सायंकाळी **05.00** वाजेपर्यंत भरता येतील.
10. निविदा दि. **18/10/2024** रोजी दुपारी 12.00 वाजता उपवनसंरक्षक, वाशिम वनविभाग वाशिम यांचे कार्यालय येथे उघडण्यात येतील निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार उपवनसंरक्षक, वाशिम वनविभाग वाशिम यांनी राखुन ठेवला आहे.
11. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार उपवनसंरक्षक वाशिम वनविभाग वाशिम यांनी राखुन ठेवला आहे व त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.
12. निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक **09/10/2024** ते **17/10/2024** पर्यंत पहावयास मिळेल.

वि.मा.का./अम./जाहि./६०८

**अभिजीत जी. वायकोस (भा.व.से.)**
**उपवनसंरक्षक (प्रादे) वाशिम वनविभाग वाशिम**


**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)


महाराष्ट्र शासन
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
एक रुपयात प्रधानमंत्री पीक विमा योजना
बळीराजा
निश्चिंत राहणार
खरीप हंगाम २०२३ मध्ये राज्यात १.७१ कोटी शेतकऱ्यांचा सहभाग.
१.१५ कोटी शेतकऱ्यांना रु.७३९३.५९ कोटी नुकसान भरपाई मंजूर, त्यापैकी ९६.७७ लाख शेतकऱ्यांना रु.५३०२.९२ कोटी वितरीत.
आपलं सरकार
लाडकं सरकार
अजित पवार
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
/MahaDGIPR
mahasamvad.in
MAHARASHTRADGIPR
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

## तालुका अधिवेशनात संघटनेचे शासनाला साकडे

# उमेदचा स्वतंत्र विभाग करा

**रिसोड – उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेच्या वतीने मागील २३ सप्टेबर पासून संपूर्ण राज्यात आंदोलन सुरु असून दि.३ ऑक्टोबर पासून राज्यभरात बेमुदत कामबंद आंदोलन सुरु आहे.**

८४ लक्ष ग्रामीन कुटुंबांच्या भल्यासाठी शासन दरबारी उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हे ग्रामविकास विभागांतर्गत स्वतंत्र विभाग करून सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र आस्थापनेला मान्यता देऊन त्यांना शासनाच्या समकक्ष पदाचा दर्जा देऊन शासन सेवेत समाविष्ट करावे तसेच सर्व समुदाय संसाधन व्यक्ती यांना गावस्तरावर काम करणाऱ्या कॅडरला शासकीय दर्जा द्यावा ही एकमेव मागणी करण्यात आलेली आहे. यामागणीच्या अनुषंगाने सर्व राज्यभर तालुका स्तरावर उमेद संघटनेच्या वतीने महाअधिवेशन तथा उमेद संघटना मागणी जनजागृती महामेळावा आयोजित करण्यात आले होते. याच अनुषंगाने दिनांक ०४/१०/२०२४ रिसोड व मालेगाव या दोन्ही तालुक्यातील शेकडो महिला, सर्व समुदाय संसाधन व्यक्ती व कंत्राटी कर्मचारी यांचा मालेगाव येथे महामेळावा आयोजित करण्यात आला होता.

महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक प्रभावी अमलबजावणी करणे होत असलेली लोककल्याणकारी योजना म्हणून उमेद अभियानाची ओळख आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील तब्बल ८४ लाख कुटुंब संघटीत झाले असून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न योजनेच्या माध्यमातून सोडवत आहेत. केंद्र सरकारचे लखपती दीदी धोरणाची अंमलबजावणी देखील राज्यात उमेद अभियानाच्या माध्यमातूनच सुरु आहे. त्यामुळे उमेद अभियानाला स्वतंत्र विभाग म्हणून घोषित केल्यास ग्रामीण महिलांचा सर्वांगिक विकासाचे ध्येय धोरणे यामाध्यमातून राबविता येतील आणि त्यांचा विकास हा शास्वत व चिरकाल पद्धतीने करता येईल.

त्यामुळे दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्यभर सर्व तालुक्यांमध्ये तालुका स्तरीय अधिवेशन बोलाविण्यात आले होते. त्यानुसार संघटनेच्या मागणीबाबत चर्चा करून दि.६ ऑक्टोबर २४ रोजी राज्यस्तरीय अधिवेशनाची तयारी करण्यात आली.

राज्य स्तरीय महा अधिवेशनात राज्यातून तब्बल ३ लाख महिला व कर्मचाऱ्यांचा प्रत्येक्ष सहभाग असणार आहे. तसेच राज्यातील प्रत्येक गावात आभासी पद्धतीने ८० लाख महिला सहभागी होणार आहेत.

### मागण्या मान्य होत नाहीत तो पर्यंत कामबंद आंदोलन सुरूच राहणार



जुलै महिन्यात मुंबई आझाद मैदान येथे संघटनेच्यवतीने ३ दिवस मुसळधार पावसात २ लाख महिला तथा कर्मचारी यांनी आंदोलन केले होते. त्यामधे पुढील २ महिन्यात आपल्या मागण्या पूर्ण होतील असे आश्वासन दिले होते परंतु या बाबत अद्यापही शासन निर्णय प्राप्त न झाल्यामुळे एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण व दिनांक ३ तारखेपासून कामबंद आंदोलन करीत आहोत.

**संतोष आघाव जिल्हा अध्यक्ष**
**उमेद महिला व कर्मचारी कल्याणकारी मंडळ वाशिम**

तालुका स्तरावर झालेल्या या अधिवेशनात मागणीच्या अनुषंगाने उपस्थित आमदार व माजी खासदार भावणाताई गवळी, मा.आमदार विजयराव जाधव यांनी आपली मागणी रास्त आणि योग्य असल्याचे सर्व उपस्थित मान्यवर यांनी सांगितले आणि मा. मुख्यमंत्री तसेच मा.ग्रामविकास मंत्री मा.श्री. गिरीषजी महाजन साहेब याचे बोलून आपल्या मागणी संदर्भात चर्चा करून आचासंहितेपूर्वी प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे.

## म.गांधी व शास्त्री जयंतीनिमित्त अभ्यासिकेचे उद्घाटन




रिसोड : स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय रिसोड येथे महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सेवानिवृत्त प्राचार्य रामचंद्र जाधव तर प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी होते. प्रथम मानवरांच्या हस्ते महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. व प्रमुख अतिथीच्या शुभ हस्ते अभ्यासिकेचे फीत कापुन उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य कुलकर्णी यांनी माणसाने कर्म करत रहावे ते पण विधायक त्यांचे आपोआप फळ हे मधुर मिळते. महापुरुषांनी समाज उद्धारासाठी कर्म केलेत म्हणून आपण आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करतो. युवकानी ते पण महाराष्ट्रीयन युवकांनी वाचनाकडे जास्त लक्ष द्यावे. प्रशासकीय सेवेमध्ये महाराष्ट्र मागे का आहे. याचा सगळ्यांनी विचार करावा. या अभ्यासकेसाठी काहीतरी फीस घ्यावी मोफत मिळते त्याचे महत्त्व राहत नाही. इतर पक्षीय आंदोलन मोर्चे या पासुन युवकांनी अलिप्त राहून रोजगारांकडे लक्ष द्यावे. असे विविध सोदाहरण सांगितले. या प्रसंगी गांधीजी व शास्त्रीजी यांच्या जीवनावर प्रा.डवरे. प्राचार्य चव्हाण यांनी समाजानी व राजकिय नेत्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा असे सांगितले. कार्यकमाचे प्रस्ताविक वाचनालयाचे संचालक प्राचार्य कमलाकर टेमधरे यांनी तर सुत्रसंचालन शालिग्राम पठाडे व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्रविण हाडे यांनी केले. गांधीजी जयंतीनिमित्त चैतन्य बानोरे याने गांधीचे पेन्सिलने चित्र काढून आगळे वेगळे अभिवादन केले. या कार्यक्रमात डाखोरे, बी. के. चव्हाण, डॉ. गटाण्णी, इंगळे, प्रा. शरद टेमधरे उपस्थित होते. ग्रंथपाल गजानन तारापूरे यांने कार्यक्रमाचे नियोजन केले होते. श.प्र.

## बुलढाण्यात नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय

मुंबई - बुलढाण्यात नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व १०० खाटांचे आयुर्वेद रुग्णालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

## रिसोड तालुक्यात वन्यप्राण्यांचा हैदोस

रिसोड. वाशीम जिल्ह्यात हरण, निलगाय, माकड, रानडुक्कर या सारख्या वन्य प्राण्यांनी हैदोस घातला आहे. शेती पिकांचे मोठ्या प्रमाणत नुकसान होत आहे. त्यामध्ये अणखी एका वन्य प्राण्यांची भर पडली आहे. शेतकरी वैतागून गेला आहे. काही ठिकाणी हल्ल्याच्या घटनाही घडल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वन विभागाने याबाबत उपाययोजना करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांमधून होत आहे. रिसोड तालुक्यातील किनखेडा, लिंगापेन, पेनबोरी, शेलगांव, शेत शिवारात सायाळ

### सायाळ करतोय बियाणे फस्त : शेतकऱ्यांपुढे संकट



वन्य प्राण्याचा मोठयाप्रमाणत कळप वाढल्याने रब्बीतील नुकतेच पेरणी केलेले गहु, हराभरा, ज्वारी, करडी हे बियाणे रात्रीच्या दरम्यान जमिनीतील तास तासे उकरूण खातात. नासधूस करीत असल्याने शेतकऱ्यांसमोर ही नवीनच संकट उभे राहिले आहे. शेतकऱ्यांनी रब्बीतील पेरणी करावी की नाही हा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. शेतकऱ्यांनी जमवाजमव करून शेतात पेरणी केली. हे वन्यप्राणी मात्र शेती फस्त करत आहे. शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

> किनखेडा शेत शिवारात सायाळ या वन्य प्राण्यांचे प्रमाण वाढले आहे. पेरणी केलेले शेती पिकांचं मोठ्याप्रमाणत नुकसान करीत आहेत. वन विभागाने उपाययोजना कराव्यात.
>
> – राजू साळेगावकर, शेतकरी पेनबोरी

## कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ. अनुकंपा धोरणही लागू

मुंबई - राज्यातील कोतवालांच्या मानधनत दहा टक्के वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. तसेच कोतवाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना अनुकंपा धोरण लागू करण्यासही मंजूरी देण्यात आली. राज्यातील १२ हजार ७९३ कोतवालांना याचा लाभ मिळणार आहे. त्यांना मिळणाऱ्या १५ हजार रुपये इतक्या मानधनात ही वाढ देण्यात येईल. सेवेत असताना मृत्यू झाल्यास किंवा गंभीर आजार, अपघात यामुळे असमर्थ ठरल्यास शासनाच्या अनुकंपा धोरणानुसार त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासही मंजूरी देण्यात आली.

# ‘मधा’चे गाव म्हणून मोहजाबंदीची निवड

रिसोड, दि. ६ (प्रतिनिधी)

**वाशीम जिल्ह्याच्या सिमेवर डोंगराळ भागात वसलेले मोहजाबंदी गाव. गावाला घनदाट जंगलाचा वेढा तरी सुध्दा रोजगाराची रोज मजुरी साठी भटकंती ग्रामस्थांच्या पाचविला पुजलेलीच, परंतु गावातील ग्रामपंचायत व काही सुशित युवकांच्या पुढाकाराने ग्रामस्थांना स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आणि गावाची वाटचाल मधाचे गाव म्हणुन सुरू झाली.**

### ग्रामस्थांना स्थानिक रोजगारासाठी संधी उपलब्ध





जिल्हाधिकारी, जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात मधाचे गांव निवड समितीची सभा संपन्न झाली. सदरील सभेस जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस., मुख्यकार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, अभिजीत जी.वायकोस, सदस्य, तथा उप वन संरक्षक, सदस्य, तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह, सदस्य तथा जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, सदस्य, तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र संजय खंबायत, सदस्य, तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र करडा सिद्धेश देशमुख, सदस्य, तथा तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर, सदस्य, तथा गट विकास अधिकारी प्रमोद बदरखे, सदस्य सचिव तथा जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी जिवन बोथीकर, मधाचेगांव प्रतिनिधी मोहजाबंदीचे पंढरी नागरे, सरपंच मोहजाबंदी गजानन ईंगळे, जेष्ठ सहाय्यक डिगांबर लोखंडे, डिगांबर लोखंडे, ज्ञानेश्वर राऊतराव, निरिक्षक अनिकेत राठोड, सर्व जिल्हा संनियंत्रन समितीचे अध्यक्ष रमेश ईढोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोहजाबंदी गावाचा प्रस्ताव मधाचे गांव जिल्हास्तरावर प्रायोगिक तत्त्वावर कागदपत्रांची पडताळणीनंतर चर्चा होऊन निवड करण्यात आली. सदस्य सचिव तथा जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जिवन बोथीकर व ज्ञानेश्वर राऊतराव यांनी प्रस्तावित मधाचे गांव संकल्पनेची माहीती दिली. तर डिगंबर लोखंडे यांनी आभार मानले. मधाचे गांव म्हणून मोहजाबंदी गावाची निवड करण्यात आल्याने तालुक्यात उत्साहाचे वातावरण आहे.